वृत्तपत्राचे नांव - माणदेश नगरी
दिनांक - 23/9/2016

# विश्वबंधुत्वाचा विचार जोपासा : न्या. बन्नूरमठ

## सोलापूर विद्यापीठात मानवी हक्क कार्यशाळा



सोलापूर, (प्रतिनिधी) : जागतिकीकरणाच्या आजच्या कालखंडात नागरिक अधिकाधिक संकुचित व स्वकेंद्रित विचार करीत आहेत. मानवतेवरील आपला विश्वास दृढ करून, विश्वबंधुत्वाचा विचार जोपासत इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक आपण केली पाहिजे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.आर. बन्नूरमठ (सेवानिवृत्त न्यायमूर्ती, केरळ उच्च न्यायालय) यांनी केले.

सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलाच्या वतीने विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात दोन दिवस 'ह्यूमन राईटस्‌ ॲण्ड ह्यूमनायजिंग सोसायटीज' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. एन.एन. मालदार होते.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम.ए. सईद (सेवानिवृत्त प्रधान सचिव विधी व न्याय विभाग) व भगवंतराव मोरे (आय.पी.एस.), कुलसचिव डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा, सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. ई.एन. अशोककुमार, चर्चासत्राचे समन्वयक डॉ. माया पाटील व डॉ.प्रकाश व्हनकडे उपस्थित होते. सभागृहात हैदराबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दीन, म्हैसूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. मुजफ्फर असादी, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके या चर्चासत्रातील वक्त्यांसह बी.सी.यु.डी.चे संचालक प्राचार्य आर.वाय. पाटील, विविध संकुलांचे संचालक, अध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

न्यायमूर्ती बन्नूरमठ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, २०१३ पासून राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली आहे व अनेकांना न्याय मिळवून देता आला याचे समाधान आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. एन.एन. मालदार म्हणाले की, आपण आपल्या हक्कांबाबत जेवढे जागरुक असतो, तेवढाच इतरांच्याही मानवी हक्कांचा विचार करून, त्यानुसार आपल्या वागणुकीत बदल केले पाहिजेत. सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. ई.एन. अशोककुमार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माया पाटील यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. डॉ. प्रकाश व्हनकडे यांनी आभारप्रदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम.ए. सईद म्हणाले की, मानवी हक्क हे प्रत्येकाला जन्मतःच प्राप्त होणारे हक्क आहेत व हे कोणालाही हिरावून घेता येणार नाहीत असे हक्क आहेत. शिक्षण हे मानवी हक्कांची जाणीव करून देणारे महत्त्वाचे साधन आहे.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य भगवंतराव मोरे म्हणाले की, सोलापूर विद्यापीठाने अतिशय चांगल्या प्रकारे या राष्ट्रीय चार्चासत्राचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेच्या दुपारच्या सत्रात मुजफ्फर असादी यांचे व्याख्यान झाले. २३ सप्टेंबर रोजी हैदराबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील डॉ. बद्रुद्दीन, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके आदींची व्याख्याने होणार आहेत.